**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १५३३/२०२२**

**अपिलार्थी, श्री. भरत दत्तात्रय जोग,**
२८७-ए, सौजन्य, धरमपेठ एक्सटेंशन, नागपूर-४४००१०.

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक**
**नगर भूमापन अधिकारी क्रमांक ३, नागपूर.**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी**
**नगर भूमापन अधिकारी क्रमांक ३, नागपूर.**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १८.०८.२०२२**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **उपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १४.१२.२०२१ | १४.१२.२०२१ | २३.०२.२०२२ | २०.०६.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १४.१२.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "प्रकरण क्र.३३८७/९८ दिनांक ११.०९.९८ रोजी न.भु.क्र.२७० अंबाझरी मध्ये श्री. महेशचंद मोतीलाल जैन आणि निरा महेशचंद जैन यांची नावे चढविण्यात आली असून या संबंधित संपुर्ण कागदपत्रे/ फाईल/ नस्ती/ प्रकरणाची संपूर्ण विस्तृत प्रतिलीपीची" माहिती मागितल्याचे दिसून येते. सदर माहिती अर्ज जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक यांनी श्रीमती चिंचोळकर/ रामटेके, परिरक्षण भूमापक / अभिलेखापाल मौजा अंबाझरी यांचेशी संबंधीत असल्याने माहिती अर्ज वर्ग करण्यात आला. त्यावर अपिलार्थी यांनी **दिनांक २३.०२.२०२२ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २३.०३.२०२२ रोजी सुनावणी घेवून जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक नगर भूमापन अधिकारी क्र.३ यांनी संबंधित परिरक्षण भूमापक

यांना सदर धारिकेचा शोध घेवून सदर माहिती ०७ दिवसांच्या आत माहिती नि:शुल्क पुरविण्यात यावी, असा आदेश दिनांक २०.०६.२०२२ रोजी पारित करण्यात आला.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक १०.०६.२०२२ रोजी** "मागितलेली माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर दिनांक १८.०८.२०२२ रोजी आयोगात सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत, जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार सौ. डी.डी. सोनसरे उपस्थित आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी श्रीमती स्वप्ना एस. पाटील उपस्थित आहेत.

सुनावणी दरम्यान उपलब्ध कागदपत्रे तसेच झालेला युक्तीवाद लक्षात घेता, अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४.१२.२०२१ रोजी परिरक्षण भूमापक / अभिलेखापाल यांना सदर माहितीचा अर्ज त्यांच्याशी संबंधीत असल्याने वर्ग करण्यात आला. तदनंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २३.०३.२०२१ रोजी सुनावणी घेवून सदर धारिकेचा शोध घेवून सदर माहिती ०७ दिवसांच्या आत माहिती नि:शुल्क पुरविण्यात यावी, असा आदेश पारीत केला. मात्र अपीलकर्ता श्री. जोग यांना अद्याप जोडपत्र अ नुसार मागितलेली माहिती प्राप्त झाली नसल्याचे द्वितीय अपील आदेशात तसेच आज सुनावणी दरम्यान कथन केले.

प्रस्तुत प्रकरणी उपस्थित विदयमान जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर सदर प्रकरणाची संपुर्ण धारिका अपीलार्थीस प्रदान करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे सदर आदेश प्राप्त होताच अपीलार्थीस माहिती देण्यात यावी, या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(राहुल भा.पांडे)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १८.०८.२०२२**

जावक क्रमांक 5636 / दिनांक 13 SEP 2022